.nagpur

# NMC e NEWS LETTER

डिसेंबर २०१७

/nmcngp/ /ngpnmc/ www.nmcnagpur.gov.in/ http://news.nmcnagpur.org/

## मनपाचा शिक्षण सप्ताह ८ जानेवारीपासून

नागपूर : शालेय विद्यार्थ्यांचा बौद्धिक, शारीरिक, मानसिक स्तर वाढविण्यासाठी महानगरपालिका दरवर्षी शिक्षण सप्ताहाचे आयोजन करीत असते. या वर्षीचा शिक्षण सप्ताह ८ जानेवारी ते १८ जानेवारी २०१८ या दरम्यान आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती क्रीडा समिती सभापती नागेश सहारे यांनी दिली. मनपा मुख्यालयातील क्रीडा समितीच्या कार्यालयात आयोजित आलेल्या बैठकीप्रसंगी ते बोलत होते.

## समिती बैठक वृत्त

### जलप्रदाय समिती

नागपूर : नागरिकांच्या दूषित पाण्यासंबंधीच्या तक्रारी वारंवार येत आहेत. पाण्यासंबंधीच्या तक्रारी तातडीने सोडविण्याचे निर्देश जलप्रदाय समिती सभापती राजेश घोडपागे यांनी जलप्रदाय समितीच्या आढावा बैठकीत दिले. यावेळी समितीचे उपसभापती महेंद्र धनविजय, सदस्या रुपाली ठाकूर, कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) संजय गायकवाड, जनरल मॅनेजर पी.एस.राजगिरे, डी.पी.टिपणीस, ओसीडब्लूचे के.एम.पी.सिंह, राहुल कुळकर्णी, अझीझ रहमान प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी दूषित पाण्यासंदर्भातील झोननिहाय आढावा जाणून घेतला. यामध्ये सर्व तक्रारी दोन महिन्यांच्या आत सोडविण्यात याव्या, असे आदेश सभापती राजेश घोडपागे यांनी दिले. काही भागात रस्त्याचे काम सुरू आहे, अथवा पाईपलाईन दुरुस्तीचे काम सुरु असल्यामुळे पिण्याचे पाणी दूषित येत आहे. त्यावर बोलताना सभापती म्हणाले, संबंधित अधिकाऱ्याने जागेवर भेट देऊन पाहणी करावी. अडचणी असल्यास त्या तातडीने निकाली काढण्याचे आदेश सभापती घोडपागे यांनी दिले.

### वैद्यकीय सेवा व आरोग्य समिती

नागपूर : नागपूर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी शहरात कचरा करणाऱ्या उपद्रव मूल्यांवर वचक ठेवण्याच्या हेतूने उपद्रव शोध पथकाची स्थापना करण्यात आली. यामध्ये नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना अतिक्रमण हटविण्याचाही अधिकार देण्यात यावा, अशी सूचना वैद्यकीय सेवा व आरोग्य समितीचे सभापती मनोज चापले यांनी केली. बैठकीला उपसभापती प्रमोद कौरती, सदस्य लखन येरावार, विजय चुटेले, सदस्या भावना लोणारे, वंदना चांदेकर, नगरसेवक मनोज सांगोळे, आरोग्य अधिकारी (दवाखाना) डॉ.अनिल चिव्हाने, आरोग्य अधिकारी (स्वच्छता) डॉ. प्रदीप दासरवार, वैद्यकीय अधिकारी डॉ.विजय जोशी, हिवताप व हत्तीरोग विभाग प्रमुख जयश्री थोटे प्रामुख्याने उपस्थित होते. या बैठकीत कनक रिसोर्स मॅनेजमेंट कंपनीला दिलेल्या कंत्राटाबद्दल चर्चा करण्यात आली. कोणतीही प्रक्रिया करण्यापूर्वी समितीला सूचित करण्यात यावे, असे आदेश सभापती चापले यांनी दिले. नगरसेवक मनोज सांगोळे यांनी प्रभागातील स्वच्छता कर्मचारी वाढविण्याबाबत विचारले असता, आरोग्य अधिकारी डॉ.दासरवार यांनी कर्मचारी भरती प्रक्रिया ही प्रगतीपथावर असल्याची माहिती दिली. नगरसेवकांच्या सर्व तक्रारींचे निराकरण त्वरित करण्यात यावे, असे निर्देश सभापती चापले यांनी दिले. मनपाच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या दवाखानाच्या कामकाजाबद्दल चर्चा यावेळी करण्यात आली. डॉक्टर्सचे वेळापत्रक, दवाखान्याची वेळ दर्शनी भागात लावण्यात यावे, असे आदेश सभापती चापले यांनी दिले. हिवताप व हत्तीरोग विभाग प्रमुख जयश्री थोटे यांनी विभागाद्वारे करण्यात येणाऱ्या फवारणीची माहिती दिली. याबाबत बोलताना चापले म्हणाले, १५ दिवसाचे परिपत्रक काढण्यात यावे. प्रत्येक कार्यवाहीची सूचना स्थानिक नगरसेवकांना देण्यात यावी, असे आदेश चापले यांनी दिले.

# स्वच्छता सर्वेक्षणासाठी नागपूर सज्ज

**नगरसेवक आणि अधिकारीही जनजागृतीसाठी रस्त्यावर : नागरिकांचाही वाढता सहभाग**




नागपूर : 'स्वच्छ भारत अभियानां'तर्गत जानेवारी २०१८ मध्ये होणाऱ्या 'स्वच्छ सर्वेक्षणा'साठी नागपूर सज्ञ झाले आहे. जनजागृतीचे विविध साधनांचा उपयोग करतानाच नागपूर महानगरपालिका हायटेक मीडियाचा वापर प्रभावीपणे करीत आहे. या अभियानात नागपूरकरांचा सहभाग वाढावा यासाठी मनपातील पदाधिकारी, नगरसेवक, अधिकारी, कर्मचारी स्वत: रस्त्यावर उतरून स्वच्छतेसाठी जनजागृती करीत आहे.

'स्वच्छ भारत' अभियानाची सुरुवात झाल्यानंतर नागपूर महानगरपालिका प्रभावीपणे याचा प्रचार आणि प्रसार करताना दिसत आहे. विशेष म्हणजे स्वच्छ सर्वेक्षणांतर्गत नेमके काय होते, याची माहिती प्रत्येक नागरिकाला व्हावी, यासाठी मनपा गांभीर्याने कार्य करीत आहे. महापौर नंदा जिचकार यांच्या नेतृत्वात मनपातील पदाधिकारी आणि नगरसेवक तर आयुक्त अश्विन मुदगल यांच्या नेतृत्वात अधिकारी आणि कर्मचारी जीव ओतून यासाठी कामाला लागले आहेत.

## नगरसेवक-अधिकारी उतरले रस्त्यावर

'स्वच्छ सर्वेक्षणां'तर्गत स्वच्छता ॲप डाऊनलोड करणे, त्यावरून तक्रारी पाठविणे यासोबतच लोकांचा सहभाग यात मिळविणे यावर अधिक गुणांकन आहे. नागपूर शहरात सुमारे ५५००० लोकांच्या स्मार्टफोनवर ॲप डाऊनलोड व्हावे, हे उद्दिष्ट आहे. यासाठी मनपाचे सर्व अधिकारी, कर्मचारीच नव्हे तर पदाधिकारी आणि नगरसेवक प्रत्यक्ष रस्त्यावर उतरले आहेत. आतापर्यंत ३८ हजारांचा आकडा पार करण्यात यामुळे यश आले असून ज्यांनी ॲप डाऊनलोड केले नसेल त्यांनी तातडीने **Swachhata-MoHUA** हे ॲप प्ले स्टोअर मधून डाऊनलोड करावे आणि त्यावरून स्वच्छताविषयक तक्रारी पाठवाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

## स्वयंसेवी संस्था सरसावल्या

मनपाच्या खांद्याला खांदा लावून स्वयंसेवी संस्था ॲप डाऊनलोडचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी कार्यरत आहेत. शहरातील मॉल, बाजार यासारखी सार्वजनिक ठिकाणे, शाळा, महाविद्यालये, सरकारी कार्यालये, सार्वजनिक कार्यक्रमात पोहचून स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते ॲप डाऊनलोड करून देण्यासोबतच स्वच्छ सर्वेक्षणाविषयी जनजागृती करीत आहेत.



## सोशल मीडिया प्रभावी माध्यम

स्वच्छतेचा संदेश घराघरापर्यंत पोहोचावा, स्वच्छ सर्वेक्षण म्हणजे नेमके काय याबाबत लोकांना माहिती व्हावी यासाठी नागपूर महानगरपालिका फेसबुक, ट्विटर, वॉटसॲप या माध्यमांचा वापर पहिल्यांदाच प्रभावीपणे करीत आहे. सोशल मीडियाच्या वापरामुळे बहुतांश नागरिकांपर्यंत स्वच्छ सर्वेक्षणाचा संदेश पोहचत असल्याचे दिसून येत आहे.

## नागरिकांचे वॉटसॲप ग्रुप

'स्वच्छ सर्वेक्षणा'दरम्यान केंद्रीय चमू लोकांना स्वच्छ सर्वेक्षणासंदर्भात प्रश्न विचारणार आहे. नागरिकांकडून जितकी सकारात्मक उत्तरे केंद्रीय परीक्षण चमूला जातील, तितके नागपूरचे गुणांकन वाढणार आहे. त्यामुळे लोकांना याबाबतची माहिती वॉटसॲप ग्रुपच्या माध्यमातून नागपूर महानगरपालिकेतर्फे देण्यात येत आहे. आतापर्यंत सुमारे २५०० नागरिकांना ग्रुपमध्ये जोडण्यात आले असून प्रत्येक ग्रुपमध्ये स्वत: आयुक्त अश्विन मुदगल आणि अन्य अधिकाऱ्यांचा सहभाग आहे. नागरिकांशी ते स्वत: वॉटसॲप ग्रुपच्या माध्यमातून संवाद साधत आहेत.

## स्वच्छता ॲम्बेसेडरचे कार्यही उल्लेखनीय

स्वच्छता अभियानाचा उद्देश आणि संदेश अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी नागपूर महानगरपालिकेने नागपूर शहरात विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या सन्माननीय नागरिकांना 'स्वच्छता ॲम्बेसेडर' म्हणून नियुक्त केले आहे. प्रख्यात मेंदूरोग तज्ज्ञ डॉ. चंद्रशेखर मेश्राम, हास्य कवी मधुप पांडेय, डॉ. उदय बोधनकर, मॅरेथानपटू डॉ. अमित समर्थ, पर्यावरण तज्ज्ञ कौस्तुभ चॅटजी, रेडिओ जॉकी निकेता यांचा यात समावेश आहे. हे सर्व व्यक्ती आपआपल्या क्षेत्रातील व्यक्तींशी संपर्क साधून जनजागृती करीत आहेत.

# तिबेटीयन युथ काँग्रेसच्या शिष्टमंडळाची मनपाला भेट

**महापौर नंदा जिचकार यांच्याशी केली चर्चा**



नागपूर : तिबेटीयन युथ काँग्रेसच्या शिष्टमंडळाने मंगळवारी (ता.२६) नागपूर महानगरपालिकेला भेट दिली. महापौर नंदा जिचकार यांनी शिष्टमंडळाचे स्वागत केले. यावेळी त्यांच्या समवेत स्थायी समिती सभापती संदीप जाधव, माजी महापौर प्रवीण दटके, नगरसेवक धर्मपाल मेश्राम प्रामुख्याने उपस्थित होते.तिबेटमध्ये अंतर्गतवाद सध्या मोठ्या प्रमाणात सुरू आहे. यासाठी तिबेटीयन निर्वासित हे स्थानिक लोकप्रतिनिधी, भारतातील नेतृत्व, तसेच सर्व स्तरातील सामाजिक संस्था यांचे समर्थन प्राप्त करण्याकरिता संबंधित लोक आणि संस्थांना भेटी देत आहेत. याअंतर्गतच तिबेटीयन युथ काँग्रेसच्या शिष्टमंडळाने ही भेट घेतली. यामध्ये छेवांग डोलमा, पेनपा सेरिंग, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नागपूर महानगर कार्यवाह अरविंद कुकडे, भारत तिब्बत सहयोग मंचाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष अशोक मेंढे, लोबसांग टेम्पो भंते, विजय केवलरामानी, संदेश मेश्राम, लोबसांग सिरींग, गुणवंता सोमकुवर, अशोक गायकवाड, विक्की नागवंशी, गीता प्रजापती, नलिनी बंसाडे, सिरिंग नोरडू भ्यालसंग आदी उपस्थित होते.

## थोडक्यात...



### डॉ. राजेंद्र प्रसाद जयंतीनिमित्त मनपातर्फे अभिवादन

नागपूर : स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या जयंतीनिमित्त उपमहापौर दीपराज पार्डीकर यांनी सकाळी टेलिफोन एक्स्चेंज चौक स्थित डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या प्रतिमेला मनपातर्फे पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी मनपाच्या वैद्यकीय सेवा व आरोग्य समितीचे सभापती मनोज चापले, नगरसेविका श्रद्धा पाठक, प्रदीप पलांदुरकर, किशोर शिरपूरकर उपस्थित होते. डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या वेशभूषेत असलेले सर्जेराव गळपट सर्वांचे लक्ष वेधून घेत होते.

## समिती बैठक वृत्त

### परिवहन समिती

नागपूर : विद्यार्थिनी, महिलांसाठी सुरक्षित आणि सर्व सोयीयुक्त वाहतुकीच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाच्या पुढाकाराने नागपूर महानगरपालिकेच्या आपली बसताफ्यात महिलांसाठी विशेष बस लवकरच धावणार आहे. याकरिता ३२ आसनी क्षमतेच्या बसची निवड करण्याच्या निर्णय नुकत्याच झालेल्या मनपा परिवहन समितीच्या बैठकीत घेण्यात आला. अध्यक्षस्थानी समिती सभापती बंटी कुकडे, सदस्य नरेंद्र वालदे, अर्चना पाठक, मनीषा धावडे, प्रवीण भिसीकर, नितीन साठवणे, उज्वला शर्मा, वैशाली रोहणकर, निगम सचिव हरिष दुबे, परिवहन व्यवस्थापक शिवाजी जगताप यांची उपस्थिती होती. शासनाच्या वतीने महिलांसाठी विशेष बस सेवेसाठी ९.२५ कोटी रुपयांचा निधी मंजुर झाला आहे. जानेवारी २०१८ मध्ये शहरात स्वच्छ सर्वेक्षण होणार आहे. त्यासाठी शहरातील सर्व 'आपली बसेस'वर स्टीकर लावून जनजागृती करण्यात येत आहे. यासाठी परिवहन विभागाचे योगदान म्हणून तसेच कर्मचाऱ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी परिवहन समितीतर्फे आपली बस सर्वाधिक स्वच्छ ठेवणाऱ्या वाहक आणि चालक यांना स्वच्छतादूत पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल, असा निर्णय यावेळी घेण्यात आला.

### अग्निशमन व विद्युत

नागपूर : अग्निशमन विभागाकडे अस्तित्वात असलेली फायर अलर्ट हॉटलाईन सेक्युरिटी सिस्टीमसाठी नागरिकांना प्रवृत्त करावे, ज्या इमारतींची उंची १५ मीटरपेक्षा जास्त आहे अशा सर्व जुन्या व सर्व इमारतींना फायर अलर्ट सिस्टीम लावणे आता बंधनकारक करण्यात यावे, असे निर्देश अग्निशमन व विद्युत समिती सभापती संजय बालपांडे यांनी दिले.मनपा मुख्यालयात आयोजित बैठकीप्रसंगी ते बोलत होते. यावेळी उपसभापती प्रमोद चिखले, समिती सदस्य राजकुमार साहू, हरीश ग्वालबंशी, सदस्या ममता सहारे, अतिरिक्त आयुक्त रवींद्र कुंभारे, प्रमुख अग्निशमन अधिकारी राजेंद्र उचके यांच्यासह प्रमुख अग्निशमन अधिकारी बी.पी.चंदनखेडे, कार्यकारी अभियंता (विद्युत) संजय जैस्वाल, कार्यकारी अभियंता (प्रकल्प) नरेश बोरकर उपस्थित होते. फायर सेफ्टी क्ट्च्या आदेशानुसार ज्या इमारतींची उंची १५ मीटर अथवा त्याच्यापेक्षा जास्त आहे आण ज्या व्यावसायिक प्रतिष्ठानाचे बांधकाम १५० चौ.मी. पेक्षा जास्त आहे अशा सर्व इमारतींना अग्निशमन विभागाचे ना–हरकत प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे. नव्याने त्यात आलेल्या प्रणालीमध्ये फायर अलर्ट हॉटलाईन सेक्युरिटी सिस्टीम असणे आता गरजेचे आहे. या प्रणालीद्वारे त्या इमारतींची सर्व माहिती अग्निशमन विभागाकडे एका चीपद्वारे उपलब्ध असणार आहे. टाकीतील पाणी, अग्निशमन सेवा इत्यादींबाबत माहिती त्यात समाविष्ट राहणार असल्याची माहिती प्रमुख अग्निशमन अधिकारी राजेंद्र उचके यांनी दिली.

## 'स्वच्छता ॲम्बेसेडर'ने केली महापौरांसमवेत जनजागृती



नागपूर : 'स्वच्छ भारत अभियानां'तर्गत जानेवारी महिन्यात होणाऱ्या 'स्वच्छ सर्वेक्षणा'बाबत लोकांना माहिती व्हावी यासाठी महानगरपालिकेद्वारे नियुक्त केलेल्या स्वच्छता ॲम्बेसेडरनी शहरात फिरून जनजागृती केली. महापौर नंदा जिचकार यांनीही त्यांच्यासोबत रॅलीमध्ये सहभागी होऊन उत्साह वाढविला.

स्वच्छता ॲम्बेसेडर आणि महापौर नंदा जिचकार यांनी संयुक्तरित्या रेल्वे स्टेशन परिसरात स्वच्छतेविषयक जनजागृती केली. यावेळी अतिरिक्त आयुक्त रवींद्र कुंभारे, अतिरिक्त उपायुक्त जयंत दांडेगावकर, आरोग्य अधिकारी (स्वच्छता) डॉ.प्रदीप दासरवार, स्वच्छता ॲम्बेसेडर सर्वश्री डॉ.चंद्रशेखर मेश्राम, डॉ.उदय बोधनकर, कौस्तभ चॅटर्जी, मॅरेथॉनपटू डॉ. अमित समर्थ, कवी मधुप पांडेय, आर.जे. निकेता, मंगळवारी झोनचे सहायक आयुक्त हरिश राऊत, जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर प्रामुख्याने उपस्थित होते. मनपा मुख्यालयातून या रॅलीला शुभारंभ झाला. यावेळी रेल्वे स्टेशनच्या परिसरातील दुकानदारांच्या स्वच्छतेबाबत समस्या जाणून घेतल्या. स्वच्छ सर्वेक्षणाबाबत महापौर नंदा जिचकार यांनी माहिती दिली. आपली दुकाने स्वच्छ ठेवण्यासाठी आपण स्वत: पुढाकार घ्यावा, जेणेकरून आपले शहर स्वच्छ शहराच्या यादीत अग्रक्रमांकावर येईल, असे आवाहन महापौर नंदा जिचकार यांनी दुकानदारांना केले.



### 'स्काय वॉचिंग'ने अपूर्व विज्ञान मेळाव्याचा समारोप

नागपूर : नागपूर महानगरपालिका आणि असोसिएशन फॉर रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इन बेसिक सायन्स एज्युकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २० व्या अपूर्व विज्ञान मेळाव्याचा समारोप पोर्णिमा दिनानिमित्त स्काय वॉचिंगद्वारे करण्यात आला. या पाच दिवसीय मेळाव्यात देशभरातून वैज्ञानिक, प्रोफेसर आणि शिक्षकांसह विविध राज्यातील प्रतिनिधींनी भेट दिली. मेळाव्याचा लाभ सुमारे एक लाखांवर विद्यार्थी आणि पालकांनी घेतला. रविवारी छत्तीसगढ येथील योजना आयोगाचे अध्यक्ष चंद्रशेखर साहू यांनी भेट देऊन मनपा शाळेतील विद्यार्थ्यांचे कौतुक केले.मनपाच्या ३० माध्यमिक शाळांतील सुमारे २०० विद्यार्थ्यांनी १२० प्रयोगांचे सादरीकरण केले. विज्ञानासोबतच हायड्रोफोनिक्स वनस्पती, किडनी, ब्रेन आदींचे लाईव्ह डेमो बघण्याची संधी उपस्थितांना देण्यात आली. मेळाव्यात अमरावती, गोंदिया, भंडारा, सौंसर आदी भागातील शाळेतर्फे विद्यार्थ्यांसाठी 'सायंटिफिक सहली'चे आयोजन करण्यात आले होते.

### कस्तुरचंद पार्कच्या पहिल्या टप्प्यातील सौंदर्यीकरणाला हेरिटेज समितीची मंजुरी

नागपूर : कस्तुरचंद पार्कच्या पहिल्या टप्प्यातील सौंदर्यीकरणाचा संपूर्ण आराखडा तयार झाला असून नागपूर हेरिटेज संवर्धन समितीच्या बैठकीत वास्तुविशारद आणि समिती सदस्य अशोक मोखा यांनी सादर केला. या आराखड्याला समितीने मंजुरी दिली. तर जीपीओ इमारत परिसरात सुरू असलेल्या बांधकामावर समितीने आक्षेप घेतला असून बांधकाम थांबविण्यासाठी नोटीस बजावण्याचे निर्देश देण्यात आले.निरीचे माजी संचालक आणि समितीचे सदस्य डॉ. तपन चक्रवर्ती यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीला समितीचे सदस्य वास्तुविशारद अशोक मोखा, मनपाचे उपायुक्त राजेश मोहिते, नासुप्रचे अधीक्षक अभियंता सुनील गुज्जलवार, स्ट्रक्चरल इंजिनिअर पी. एस. पाटणकर, नागपूर विद्यापीठाच्या प्रपाठक डॉ. शुभा जोहरी, वास्तुविशारद हबीब खान, नीता लांबे, नगररचना सहायक संचालक सुप्रिया थूल, नगररचनाकार प्र.प्र. सोनारे उपस्थित होते.सदर बैठकीत कस्तुरचंद पार्कच्या पहिल्या टप्प्यातील सौंदर्यीकरणाचा आराखड्याचे वाचन समितीचे सदस्य अशोक मोखा यांनी केले. याअंतर्गत होणाऱ्या सौंदर्यीकरणामध्ये अंतर्भूत असलेल्या बाबींची माहिती त्यांनी दिली. या आराखड्याला समितीच्या सदस्यांनी सर्वानुमते मंजुरी दिली. जीपीओ इमारत परिसरात सुरू असलेल्या बांधकामाची बाब समितीच्या लक्षात आल्यानंतर त्यावर समितीने तीव्र आक्षेप घेतला. हेरिटेज संवर्धन समितीची कुठलीही परवानगी न घेता बांधकाम सुरू असल्यामुळे तातडीने संबंधित प्रशासनाला नोटीस बजावण्याचे निर्देश बैठकीचे अध्यक्ष श्री. तपन चक्रवर्ती यांनी दिले. नागपूर हेरिटेज संवर्धन समितीचे अध्यक्ष भा.प्र.सेवेतील निवृत्त अधिकारी अरुण पाटणकर यांचे २५ नोव्हेंबर रोजी निधन झाले. सभेच्या प्रारंभी त्यांना समिती सदस्यांनी श्रद्धांजली अर्पण केली.




## कस्तुरचंद पार्कच्या विकासासाठी पाच कोटी

### सर कस्तुरचंद डागा पुण्यातिथी शताब्दी समारोहात मुख्यमंत्र्यांची घोषणा

नागपूर : सर कस्तुरचंद डागा यांनी नागपूरच्या विकासाला आपल्या दूरदृष्टीतून नवा आयाम दिला. त्यांची आठवण करून देणारे कस्तुरचंद पार्क हे शहराच्या संस्कृतीची आणि विकासाची ओळख आहे. नागपूरच्या जीवनाला नवा आकार देणारे केंद्र आहे. नागपूरचे वैभव असलेल्या कस्तुरचंद पार्कच्या विकासासाठी राज्य शासनातर्फे पाच कोटी रुपये देण्यात येतील, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.सर कस्तुरचंद डागा यांच्या पुण्यतिथी शताब्दी समारोहानिमित्त नागपूर महानगरपालिकेतर्फे कस्तुरचंद पार्क येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी, राज्याचे उर्जामंत्री व नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महापौर नंदा जिचकार, खासदार अजय संचेती, आमदार सुधाकर देशमुख, आमदार जोगेंद्र कवाडे, राष्ट्रीय माहेश्वरी सभेचे अध्यक्ष श्याम सोनी, गोविंद डागा, विदर्भ इंडस्ट्रीयल असोसिएशनचे अध्यक्ष अतुल पांडे, वेदचे अध्यक्ष देवेंद्र पारेख, उपमहापौर दीपराज पार्डीकर, स्थायी समिती सभापती संदीप जाधव, सत्तापक्षनेते संदीप जोशी, एलीबर्न वार्णे व्यासपीठावर उपस्थित होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुढे बोलताना म्हणाले, सर कस्तुरचंद डागा यांनी नागपूरच्या विकासाचा पाया रचला. नागपूर भारतातील व्यापाराचे केंद्र होऊ शकते. हे त्यांनी ओळखले आणि येथून देशांतर्गत नव्हे तर देशाबाहेरही व्यापाराची वृद्धी केली. हेच आपण जर आज ओळखले, सर कस्तुरचंद डागा यांचा आदर्श समोर ठेवला तर नागपरच्या विकासाला नवी दिशा मिळेल. सर कस्तुरचंद डागा यांनी आपल्या दातृत्वातून आपले कार्य अजरामर केले. अश्या व्यक्तीची आठवण या शहराने केली. याचा मला अभिमान आहे. सर कस्तुरचंद डागा यांच्या सन्मानार्थ बोलताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले, दानशुर व्यक्तीचा संबंध जात, भाषा याच्याशी नसतो. तो त्याच्या दानी वृत्ती आणि विकासाच्या दृष्टीशी असतो. सर कस्तुरचंद डागा यांनी आपल्यातील कुशल व्यवसायिकाचा परिचय दिला. ते व्यावसायिक असले तरी त्यांच्याजवळ विकासाची दृष्टी आणि व्हीजन होते.प्रास्ताविकात नंदा जिचकार यांनी सर कस्तुरचंद डागा यांचा जीवन परिचय देत त्यांच्या स्वप्नातील स्वच्छ सुंदर नागपूर साकार करण्याचे आवाहन केले.